=22=

जिल्हा परिषदांकडील निरुपयोगी व विनावापर पडून असलेली यंत्रसामुग्री/वाहने निकाली काढणे/ वाहनांचे परिरक्षण व दुरुस्ती तसेच नवीन वाहनांची खरेदी व वाहने भाड्याने घेणे.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. जेईपी १०९९/ प्र.क्र. १३५/०५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक :- ३१ ऑगस्ट १९९९.

G.A.D. =23= ~~सक्षम~~ २५१ प्रति 2

जिल्हा परिषद, अकोला
दिनांक 10 SEP 1999

जिल्हा परिषदांकडील निरुपयोगी व विनावापर पडून असलेली यंत्रसामुग्री/वाहने निकाली काढणे/ वाहनांचे परिरक्षण व दुरुस्ती तसेच नवीन वाहनांची खरेदी व वाहने भाड्याने घेणे.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. जेईपी १०९९/ प्र.क्र. १३५/०५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक:- ३१ ऑगस्ट १९९९.

वाचा :-
१) शासन निर्णय , ग्राम विकास विभाग क्र. जेईपी १०८९/सीआर ३५९०/२६, दिनांक ८ ऑगस्ट, १९८९.
२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. जेईपी १०८९/सीआर ३५८३/२६, दिनांक ८.८.१९८९.
३) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. जेईपी १०८९/सीआर ३५८३/२६, दिनांक ४.६.१९९०.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र १०९१/प्र.क्र. १२/विनियम, दिनांक ९.१०.१९९१.
५) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग क्र. पंरास २०९२/सीआर ७७५/२६, दिनांक २१ जुलै, १९९२.
६) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. जेईपी १०९३/ सीआर १५४१/२६, दिनांक २३ मार्च, १९९३.
७) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. जेईपी १०९३/ सीआर ९१४/२६, दिनांक २.८.१९९३.
८) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. इंधन १०९२/सीआर ७४०/२६, दिनांक १२.११.९३.
९) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसधारण विभाग, क्र. जेईपी १०९३/सीआर ९३१/२६, दिनांक ४ जानेवारी, १९९४.
१०) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. जेईपी १०९३/ सीआर १६१०/२६, दिनांक ७ नोव्हेंबर, १९९४.
११) शासन निर्णय, उच्च तांत्रिक शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. आयटीआय ३०९४/ (४०७४)/व्यशि-१, दिनांक ४ फेब्रुवारी, १९९५.
१२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. बीजीटी १०९७/प्र.क्र. २४ अ/अर्थ-१९, दिनांक २जून,९८.
१३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. बीजीटी १०९७/प्र.क्र. २४-अ/अर्थ-१९, दिनांक २ जून, ९८.
१४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र १०९५/प्र.क्र. २०/९५/विनियम, दिनांक ९ जुन, १९९५.

प्रस्तावना :-

जिल्हा परिषदांकडील विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी वेगवेगळी यंत्रसामुग्री अथवा वाहने जिल्हा परिषदांकडे अन्य विभागाकडून हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे ग्राम विकास विभागाकडून अथवा जिल्हा परिषदांच्या स्वत:च्या निधीतून किंवा घसारा निधीतून घेण्यात आली आहेत. कालांतराने अत्यंत

जुनी व निरुपयोगी अशी सामुग्री व वाहने व इतर तत्सम वस्तू निकालात काढण्याबाबत वेळोवेळी शासन परिपत्रकाव्दारे सूचना देऊन सुध्दा या कामी हवे तेवढे लक्ष देण्यात आलेले नाही असे आढळून येते. अशी अत्यंत जुनी व निरुपयोगी यंत्रसामुग्री अथवा वाहने वेळीच निकाली न काढल्यास ती अधिक खराब होऊन विक्रीद्वारे होण-या किंमतीमध्ये घट येते. शिवाय विकास कामासाठी उपलब्ध होणारा निधी त्यामुळे गुंतुन पडतो. व विनाकारण जागा व्यापली जाते. या बाबतीत गांभिर्याने लक्ष देणे आवश्यक असल्यामुळे व वर प्रस्तावनेत नमूद केलेल्या परिपत्रकाद्वारे वेळोवेळी आदेश निर्गमित केले असले तरी वाहनासंबंधीच्या अशा प्रकारच्या सर्व आदेशांचे संकलन करुन सर्वसमावेशक आदेश काढणे गरजेचे असल्यामुळे याबाबतीत आजतागायत काढलेल्या वाहनासंबंधीच्या सर्व आदेशांचे एकत्रीकरण करुन सर्व जिल्हा परिषदांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(अ) निरुपयोगी व विनावापर पडून असलेली यंत्रसामुग्री/वाहने

जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांकडील वाहने व यंत्रसामुग्री निकालात काढून त्याबदली नवीन वाहने/यंत्रसामुग्री घेण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश अंमलात येतील:-

शा.नि.ग्रा.वि. वि.जेईपी १०८९/सीआर ३५९०/२६,दि. ८ ऑगस्ट,८९

१) जुनी व विनावापर पडून असलेली अथवा वाजवी दुरुस्ती करुन वापरण्यायोग्य नसलेली वाहने १० वर्षाचा कालावधी अथवा सुमारे २,००,००० कि.मी. धावसंख्या झाल्यानंतर निकाली काढण्यास योग्य ठरतील.

२) जूनी व विनावापर पडून असलेली किंवा वाजवी दुरुस्त करुन वापरणे योग्य नसलेली यंत्रसामुगी १० वर्षाच्या सेवा कालावधीनंतर निकाली काढणे योग्य राहिल.

शा.नि.वि.वि.क्र.१०९१ /प्र.क्र.१२/विनियम, दि.१.१०.९१

३) विविध शासकिय विभागाकडून जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांकडे हस्तांतरीत झालेली वाहने व यंत्रसामुग्री निकालात काढण्यापूर्वी त्या त्या संबंधित शासकिय विभागाची परवानगी घेण्यात यावी व अशा वाहनांचे आयुष्य वित्त विभागाच्या दिनांक १.१०.१९९१ च्या शासन निर्णयानुसार खालील अटींवरुन ठरवावे. निरनिराळया वाहनांचे आयुष्य धावल्याचे अंतर (कि.मी.) आणि वाहन वापरल्याचा कालावधी (वर्षे) यापैकी जे नंतर पूर्ण होईल ते यावरुन निश्चित करावे.

१) लॉरी/अवघड मोटार वाहने-धावसंख्या २ लक्ष कि.मी./१० वर्षे.
२) मोटार वाहने/जीप धावसंख्या २.४० लक्ष कि.मी./१० वर्षे
३) मोटार सायकली - धावसंख्या ३.०० लक्ष कि.मी./१० वर्षे.

मात्र वरील अटी पूर्ण करण्यापूर्वीच एखादे वाहन (अपघात वगैरेमुळे) निरुपयोगी ठरवावयाचे झाल्यास कार्येकारी अभियंता,यांत्रिकी विभाग किंवा महाराष्ट्र परिवहन सेवा यांचेकडून वाहन या पेक्षिकडे उपयोगात आणणे आर्थिकदृष्टया किफायतशीर राहणार नाही असे प्रमाणपत्र मिळाल्यावरच वाहन निरुपयोगी ठरविण्यात यावे, मात्र वरील अटी पूर्ण झाल्यास तसे प्रमाणपत्र मिळविण्याची आवश्यकता नाही.

शा.नि.ग्रा.वि वि.जेईपी १०८९/सीआर ३५९० / २६,दि.८ ऑगस्ट,८९

४) निकाली काढावयाची यंत्रसामुग्री /वाहने निकाली काढण्यापूर्वी तांत्रिक (यांत्रिक) सल्ला घेणे आवश्यक आहे.

५) सदर यंत्रसामुग्री /वाहने निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात यावी. या समितीमध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या जिल्हा परिषदेच्या /शासनाच्या

संबंधित विभागाचे तांत्रिक कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अधिकारी यांचा समावेश असावा.

६) जिल्हा परिषदेकडील जुनी व विनावापर पडून असलेली यंत्रसामुग्री /वाहने जाहीर लिलावाद्वारे मान्य यादीतील लिलाव करणा-या कंत्राटदारामार्फत निकालात काढावी. तत्पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या समितीने सदर यंत्रसामुग्री / वाहनांची बाबवार वाजवी किंमत (अपसेट व्हॅल्यू) ठरवावी. ही जूनी वाहने लिलाव केल्यानंतर आलेली किंमत त्या त्या विभागाचे संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करावी.

७) विविध शासकीय विभागांकडून जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत झालेल्या यंत्रसामुग्री/वाहनांच्या बाबत अशी जूनी व निरुपयोगी वाहने/यंत्रसामुग्री निकालात काढण्याच्या दृष्टीने त्या त्या संबंधित प्रशासकीय विभागाने /जिल्हा परिषदांकडे पाठपुरावा करावा तसेच याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागाने त्याची योग्य ती छाननी करुन लवकर संमत करावा.

८) जिल्हा परिषदेच्या अपु-या निधीमुळे त्यांना स्वत:च्या उत्पन्नातून फारशी यंत्रसामुग्री /वाहने घेणे शक्य झालेले नाही व शासकीय विभागांकडील हस्तांतरीत झालेली यंत्रसामुग्री / वाहने जुनाट असल्यामुळे त्याचा विपरित परिणाम विविध योजनांच्या अंमलबजावणीवर होतो. सबब विविध शासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी जिल्हा परिषदेसाठी जून्या व निकाली काढण्यायोग्य यंत्रसामुग्री /वाहनांच्या बदली नवीन यंत्रसामुग्री /वाहने पुरविण्या बरोबरच अधिक यंत्रसामुग्री /वाहने पुरविण्याकडे लक्ष द्यावे व त्यासाठी आवश्यक तेवढी तरतूद करण्यात यावी.

९) जुनी व निरुपयोगी वाहने/यंत्रसामुग्री निकालात काढण्याचा प्रस्ताव विचारात घेताना त्या बदली नवीन वाहने/यंत्रसामुग्री घेण्याबाबतचा प्रस्ताव त्वरीत विचारात घेण्यात यावा. किंबहुना हा कार्यक्रम टप्याटप्याने व योजनाबध्द पध्दतीने असा आखावा की जेणेकरुन जुनी वाहने /यंत्रसामुग्री निकालात काढल्यामुळे त्याचा विकास कामावर विपरित परिणाम होणार नाही.

१०) जुनी वाहने/यंत्रसामुग्री निकालात काढून त्या बदली नवीन वाहने/यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी विभागीय आयुक्ताकडे पाठविताना सदर प्रस्तावामध्ये जोडपत्र " अ " मध्ये नमूद केलेली सर्व माहिती प्रमाणपत्र व जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचा ठराव जोडावा.

शासन परिपत्रक ग्रा.वि.वि.व ज.सं.वि.क्र. जेईपी१०९३/सीआर १५४१/२६ दि. २३.३.९३

११) जिल्हा परिषदेकडून निर्लेखित वाहनांऐवजी खर्चिक गाडया बदलून मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठविण्यात येतात. तथापि याबाबत शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जेईपी-१०९३/सीआर १५४१/२६, दिनांक २३ मार्च १९९३ नुसार अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत की, जिल्हा परिषदेच्या कार्यालयीन वापराकरीता वाहनांची खरेदी करताना सदर वाहने अॅम्बेसेडर कार (डिझेल अथवा पेट्रोल) महिंन्द्र जीप्स अथवा प्रिमिअर पदमीनी, फियाट या व्यतिरिक्त कोणतीही वाहने खरेदी करण्यात येऊ नयेत.

उच्च तंत्रशिक्षण आणि सेवायोजन वि.चा शा.नि.

१२) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या दिनांक ४ फेब्रुवारी, १९९१ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे ज्या नियमित वापराच्या दृष्टीनें अयोग्य अशा वस्तू निर्लेखित केल्या जातात त्या वस्तू लिलावाद्वारे विकून टाकण्याऐवजी राज्यातील

आयटीआय ३०९४/ (४०७४) / व्यशि-१ दिनाक ४.२.१९९५

औद्योगिक प्रशिक्षण संस्था/तंत्रशिक्षण, माध्यमिक शाळा, तंत्र निकेतन/अभियांत्रिकी महाविद्यालये या संस्थांना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करुन हस्तांतरीत करावयात.

(एक) नेहमीच्या कामाच्या दृष्टीने उपयुक्तता संपलेल्या परंतु प्रात्यक्षिक प्रशिक्षणाच्या दृष्टीने उपयुक्त असलेल्या मोटार कार्स, जीप्स इत्यादी वस्तू असतील तर त्या निर्लेखित करुन लिलावाने विकण्यापूर्वी प्राधान्याने राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था/तंत्रशिक्षण माध्यमिक शाळा, तंत्र निकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालयें या संस्थांना विचारणा करण्यात यावी.

(दोन) या कामात सुसूत्रता रहावी म्हणून त्या जिल्हयातील प्रशासकीय तंत्रनिकेतनाचे प्राचार्यांना " समन्वयक " म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. ज्या प्रशासकीय कार्यालयातून वर नमूद केलेल्या बाबी असतील त्यांनी त्याची यादी त्या जिल्हयाच्या शासकीय तंत्रनिकेतनाचे प्राचार्यांकडे पाठवावी. समन्वयक प्राचार्य व त्या त्या विभागाचे उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उप संचालक, तंत्र शिक्षण यांची समिती अशा वस्तूंची छाननी व संस्थानिहाय आवश्यकता निश्चित करतील.

(तीन) संबंधित कार्यालयाकडून विचारणा झाल्यापासून एका महिन्याच्या कालावधीत जिल्हयांच्या शासकीय तंत्र निकेतनाचे प्राचार्य वा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी वस्तूंची तपासणी करुन त्याची उपयुक्तता निश्चित करतील त्यांनतर कोणत्या संस्थेस त्या वस्तू द्याव्यात हे संबंधित कार्यालयास कळविले जाईल. विहित मुदतीत मागणी प्राप्त न झाल्यास अशा बाबींची विल्हेवाट संबंधित कार्यालये नेहमीच्या पध्दतीने करतील.

(चार) आवश्यक असलेल्या वस्तूंची संस्थांना गरज असल्यास हे हस्तांतरण शासनाच्या दोन विभागामध्ये असल्याने कोणतेही मूल्य प्रत्यक्ष न आकारता या वस्तू संबंधित संस्थांना हस्तांतरीत केल्या जातील. शासनाच्या प्रचलित हस्तांतरणाच्या पध्दतीनुसार आवश्यक ती कागदपत्रे वा अन्य तपशील हस्तांतरणाच्या वेळी दिला जाईल. त्याचप्रमाणे अशा हस्तांतरीत वस्तूंची नोंदसंबंधित संस्थेच्या जडसंग्रह वहीमध्ये " जुनी/निर्लेखित वस्तू" अशा स्पष्ट उल्लेखासह करुन त्या त्या वस्तूंची घसारा वजा जाता येणा-या अंतिम मूल्यांची नोंद केली जाईल.

(पाच) हस्तांतरण करणा-या विभागाकडून/कार्यालयाकडून सूचना प्राप्त होताच संबंधित संस्था प्रमुख वस्तू ताब्यात घेऊन त्या नेण्याची व्यवस्था करतील.

वरील बाबतीत काही माहिती स्पष्टीकरण अपेक्षित असल्यास ते संचालक, तंत्रशिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई अथवा संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचेकडून प्राप्त होऊ शकेल. [redacted]

शा.नि.वि.वि.क्र. बीजीटी १०९७/ प्र.क्र.२४अ/अर्थ ११ दिनांक १५.१२.१९९८

ब) नवीन वाहन खरेदीवरील बंधने

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक बीजीटी-१०९७/प्र.क्र.२४-अ/अर्थ-११, दिनांक १५.१२.१९९८ नुसार शासकीय विभागांनी आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी पुढील आदेशापर्यंत कोणत्याही प्रकारच्या नवीन वाहनांची खरेदी करु नये. वाहनांची ज्या ज्या वेळी निकड भासेल त्या त्या वेळी फक्त ठराविक कालावधीसाठीच वाहने भाडयाने घ्यावीत. पूर्णत: निकामी झालेली वाहने बदलतांना सुध्दा शक्यतो त्याच्या बदली भाडयाने वाहने घेऊनच वापर करावा. ज्या पदाच्या स्वरुपामुळे शासकीय वाहन आवश्यक असेल अशा पदाचे निकामी झालेली वाहने बदलण्यासाठी शासनाकडे मंजुरी प्रस्ताव पाठवावेत असे आदेश आहेत.

शा.नि.ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र. जेईपी१०९३/ प्र.क्र.१६९०/२६.

क) जिल्हा परिषदांकरीता वाहने भाडयाने घेण्याबाबत

जिल्हा परिषद कायद्याच्या कलम १०० नुसार विविध शासकीय योजना अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत झालेल्या आहेत. यासाठी आवश्यक तो निधी, आस्थापना, साधनसामुग्री, संबंधित शासकीय विभागाने जिल्हा परिषदांना देणे

दि.७.११.१९९४.

आवश्यक आहे. त्यासाठी त्या त्या विभागाचे राज्य क्षेत्रातील निकष आधारभूत धरावयाचे आहे

निधी उपलब्धतेअभावी जिल्हा परिषदांकडील अनेक विभागांनी संबंधित शासकीय विभागांना वाहने पुरविलेली नाहीत असे दिसून येते. याबाबत जिल्हा परिषदा व त्यांच्या संबंधित विभागाकडून वारंवार शासनाकडे मागणी केली जाते. वाहने खरीदीवरील खर्च, वाहनांवरील दुरुस्ती, इंधन, वाहनचालक व इतर शासकीय खर्च यांचा विचार करता नवीन वाहने विकत घेण्याऐवजी भाडयाने वाहने घेणेसुध्दा शक्य आहे, असे दिसते. याबाबत विचार करुन शासनाकडून सार्वजनिक आरोग्य विभागास जिल्हा परिषदेकडील आरोग्य विभागांसाठी आवश्यक वाहने भाडयाने घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वाहने भाडयाने घेण्याची कार्यवाही पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात यावी. याबाबत वित्त विभागाने दिनांक १५.१२.१९९८ रोजी दिलेले आदेश वर नमूद केलेले आहेतच.

१) भाडयाने वाहने घेण्याबाबतची कार्यवाही सोबतच्या जोडपत्र " ब " मधील नियमावलीस अधीन राहून करावी.

२) प्रशासकीय विभागांनी जिल्हा परिषदांना केवळ त्यांच्या राज्य क्षेत्रातील निकषानुसार अनुज्ञेय असलेली वाहने खरेदीद्वारे अथवा भाडयाने घेण्यास मंजूरी द्यावी.

३) प्रशासकीय विभागांकडे जिल्हा परिषदांसाठी नवीन वाहने खरेदी करण्यास निधी उपलब्ध असल्यास अथवा त्या विभागाने जिल्हा परिषदांना नवीन वाहने उपलब्ध करुन दिल्यास भाडयाची वाहने परत करण्यात यावीत. तत्पूर्वी संबंधित प्रशासकीय विभागांना भाडयाची वाहने व स्वतःचे वाहन यांच्या व्यवहार्यतेबाबत विचार करुन योग्य तो निर्णय घेणे व वाहनांच्या वापराबाबत योग्य त्या सूचना जिल्हा परिषदांना द्याव्यात.

४) वाहनांच्या भाडयावरील खर्चापोटीची रक्कम संबंधित प्रशासकीय विभागाने जिल्हा परिषदेला द्यावी व हा खर्च कार्यालयीन व प्रवास खर्च यासाठी त्या विभागाकडून देण्यात आलेल्या तरतूदीतील वाढीद्वारे मागविण्यात यावा.

५) जिल्हा परिषदांनी यासाठी स्वनिधीतून कोणताही खर्च करु नये.

६) वाहने भाडयाने घेण्यापूर्वी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता अधिनियम १९६८ मधील तरतूदीनुसार जाहीर निविदा मागविण्यात याव्यात व त्यानुसार कार्यवाही करावी.

ग्रा.नि.ग्रा.वि.वि.क्र झेपी १०८९/ [illegible] ३५८३/२६, दि.[illegible].१९९०.

ड) जिल्हा परिषदेकडील वाहनांचे परिरक्षण व दुरुस्ती

जिल्हा परिषद /पंचायत समितीमधील वाहनांवरील दुरुस्ती खर्च व पेट्रोल/डिझेलच्या मर्यादेबाबत पुढील आदेश अंमलात येतील. युनिसेफकडून प्राप्त झालेले वाहन अथवा मंत्रालयीन विभागामार्फत हस्तांतरीत योजनांच्या अंमलबजावणीसाठी वर्ग झालेल्या वाहनांबाबत हे आदेश लागू असणार नाहीत. यावरील दुरुस्ती व इंधन खर्च त्या विभागाच्या अनुदानातून करावयांचा असल्यामुळे याबाबत त्या संबंधित विभागाचे आदेश/मार्गदर्शन घ्यावे.

१) जिल्हा परिषदेकडील वाहनांसाठी डिझेल, पेट्रोलच्या खर्चासाठी पुढीलप्रमाणे वार्षिक मर्यादा घालण्यात येत आहे :-

(अ) जिल्हा स्तरावरील वाहने वार्षिक ४००० लिटर

(ब) विभागीय स्तरावरील वाहने वार्षिक ३५०० लिटर.

या विहित मर्यादेपेक्षा पेट्रोल /डिझेलवरील खर्च वाढणार नाही याची संबंधित अधिकारी, कर्मचारी व विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी. या विहित मर्यादेपेक्षा जास्त होणा-या डिझेल/पेट्रोलवरील खर्चास अत्यंत अपवादात्मक प्रकरणामध्येच विभागीय आयुक्तांकडून मान्यता मिळू शकेल. अन्यथा अकारण जादा होणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल याची कृपया दक्षता घ्यावी.

मुख्य /उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व इतर अधिकारी, जिल्हा परिषद व सर्व विषय समित्यांचे पदाधिकारी अध्यक्ष, सभापती, जिल्हा परिषदा यांच्या अधिनस्त असलेली वाहने म्हणजे जिल्हा स्तरावरील वाहने समजावीत. तसेच विभागीय आयुक्त/सहाय्यक आयुक्त (विकास) यांच्या अधिनस्त असलेली वाहने ही विभागीय स्तरावरील वाहने समजावीत. पंचायत स्तरावरील वाहनांना जिल्हा स्तरावरील वाहनाच्या मर्यादाच लागू असतील.

शा.नि.ग्रा.वि.वि.क्र. इंधन १०९२/ सीआर ७४०/२६, दि.१२.११.१९९३

अध्यक्ष, जिल्हा परिषद यांच्या वाहनासाठी असलेली वार्षिक ४००० लिटर इंधन मर्यादा वाढवून ती दिनांक १२.११.१९९३ पासून वार्षिक ६००० लिटर करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेकडील अन्य कोणत्याही वाहनासाठी सदर वाढीव मर्यादा लागू असणार नाही इंधन मर्यादेपेक्षा केलेल्या वाढीसह एकूण मर्यादेस शासनाने लागू केलेले कपातीचे आदेश बंधनकारक राहतील. सध्या इंधन वापरामध्ये २५% कपात करण्याचे शासनाचे आदेश आहेत.

(२). महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ९५ नुसार दुरुस्तीची आवश्यकता असेल अशा मोटार वाहनांच्याबाबत तात्काळ विभाग प्रमुख किंवा गट विकास अधिका-यांच्या निदर्शनास सदर बाब वाहन चालकाने लेखी आणणे आवश्यक आहे. याबाबत खात्री झाल्यानंतर विभाग प्रमुख/गट विकास अधिकारी रु.५००/- पर्यंतच्या दुरुस्ती खर्चास मंजूरी देऊ शकतील. यावरील दुरुस्ती खर्चासाठी तांत्रिक सल्ला घेणे आवश्यक आहे. सदर तांत्रिक सल्ला उप अभियंता / कार्यकारी अभियंता ( यांत्रिकी) प्रादेशिक परिवहन अधिकारी अथवा भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेतील सहाय्यक खोदन अभियंता /वरिष्ठ खोदन अभियंता यांचे प्रमाणपत्रांचे स्वरुपात असावा :-

(३) सर्वसाधारणपणे २५ हजार मैल (४० हजार कि.मी.) एवढी धावसंख्या झाल्यानंतर वाहनाचे टायर / टयुब बदलण्याची आवश्यकता असेल तर ते बदलावेत. तथापि त्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याने पुढील अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

(अ) वाहनाच्या टायर / ट्युबच्या बदलीमुळे त्यावर्षी सदर वाहनाच्या दुरुस्तीसाठी असलेली वार्षिक विहीत मर्यादा ओलांडली जाणार नाही.

(ब) जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये यासाठी पुरशी तरतुद केलेली असेल.

(क) नवीन टायर / टयुब खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील विहित पध्दतीचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

(ड) बदलीने करावयाचे टायर / टयुब यापुढे वापरण्यास अयोग्य असल्याबाबत उपरोक्त क्र. २ मधील कोणत्याही सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र असावे.

शा.नि.जेईपी १०९३/ सीआर २३१/२६, दि.३.९.१९९४ व समक्रमांकाचे दि.२७.१०.९५ चे

४. जिल्हा परिषद व पंचायत समितीकडील वाहनावरील दुरुस्ती व भागखरेदीवरील खर्चाची वार्षिक मर्यादा डिझेल वाहनासाठी रु. २०,०००/- व पेट्रोल वाहनासाठी रु. १८,०००/- अशी राहील. सदर मर्यादा दिनांक १ एप्रिल, ९४ पासून अंमलात येईल. चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील विशेष कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु असलेल्या भागामध्ये सदर मर्यादा डिझेल वाहनासाठी रु. २०,०००/- तर पेट्रोल वाहनासाठी रु. १८,०००/ अशी असेल परंतु अपवादात्मक परिस्थितीत

शुध्दीपत्रक.

विभागीय आयुक्तांच्या परवानगीने सदर खर्च डिझेल वाहनासाठी रु. ३०,०००/- तर पेट्रोल वाहनासाठी रु. २५,०००/- पर्यंत करण्यास अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

५. सदर वाढीव मर्यादा जिल्हा परिषदेचे सहा पदाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, २ उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अशी १० जनरल वाहने व पंचायत समित्यांकडील गट स्तरावरील वाहनांना लागू होईल.

६. जिल्हा परिषदाकडे विविध योजनांच्या अंतर्गत [illegible] असलेली वाहने अथवा सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठी वापरली जाणारी वाहने यावरील दुरुस्तीखर्चासाठी सदर मर्यादा लागू होणार नाही या वाहनासाठी त्या त्या संबंधित विभागाची विहीत केलेली मर्यादा लागू असेल.

७. सदर वाढीव मर्यादेवरील खर्चापोटी शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होणार नाही. जिल्हा परिषदेकडील १० जनरल वाहने व पंचायत समितीकडील गट स्तरावरील वाहने यांच्या देखभाल दुरुस्ती व इंधनावरील खर्च जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निधीतून करण्यात यावा त्यासाठी शासकिय अनुदान अनुज्ञेय नाही. सदर विहीत मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

शा.नि.ग्रा.वि.वि.क्र. जेडीपी १०८९/ सीआर ३५८३/२६, दि.४.६.१९९०.

८. उपरोक्त सुचनांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडील कोणत्याही वाहनांच्या दुरुस्तीवरील खर्च त्या वर्षासाठी ज्या विहित मर्यादा घालण्यात आल्या त्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता जिल्हा परिषद पंचायत समितीचे अधिकारी / पदाधिकारी यांनी घ्यावी. या विहीत मर्यादेपेक्षा झालेला जादा खर्च अवाजवी व अकारण झालेला असेल तर तो संबंधिताकडून वसूल करावा.

९. जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी केलेल्या कार / जीपवर होणारा इंधन दुरुस्ती व देखभाल खर्च जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातून करावा. त्यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान जिल्हा परिषदेला अनुज्ञेय नाही. तसेच पंचायत समितीसाठी शासनाकडुन देण्यात आलेल्या गट स्तरावरील जिपच्या इंधन व देखभाल दुरुस्तीचा खर्च सुध्दा जिल्हा परिषदेने स्वतःच्या निधीतून करावयाचा आहे.

१०. जिल्हा परिषद निधीतून खरेदी केलेल्या वाहनांचा वापर ज्यावेळी काही कालावधीसाठी विशिष्ट योजनेच्या अंमलबजावणीसाठी केला जात असेल तर त्या कालावधीतील त्या वाहनावरिल इंधन व दुरुस्ती खर्च यासंबंधी योजनेच्या खर्चातून करावा. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून करु नये.

११. कलम १२३ नुसार एजन्सी बेसीस वर व कलम २६१ नुसार सर्व्हीसेस रिक्वीझेशन वर जिल्हा परिषदेला मिळालेल्या वाहनासाठी इंधन, दुरुस्ती व देखभालीवर होणारा खर्च शासनाच्या त्या त्या संबंधीत विभागाच्या अनुदानातून करण्यात यावा.

१२. अपघात किंवा वाहन बरेच वर्ष वापरल्यानंतर काही वेळा वाहनाची विशेष दुरुस्ती करावी लागते अशा वेळी अशा विशेष दुरुस्ती वरील खर्च हा वार्षिक विहीत मर्यादेमध्ये करणे शक्य नसते, केवळ अशा अत्यंत अपवादात्मक प्रकरणात वाहनावरील दुरुस्ती / भाग खरेदी वरील खर्च वार्षिक विहित मर्यादेपेक्षा जास्त होत असल्यास / झालेला असल्यास त्यास पूर्व मंजुरी / कार्योत्तर मंजूरी देणे बाबत तसेच जूनी नादुरुस्त वाहने निर्लेखित करुन नवी वाहने खरेदी करण्याबाबतचे अधिकार ग्राम विकास व

जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. जेईपी १०९९/प्र.१२८/९९/०५, दिनांक ९ जुलै, १९९९ नुसार विभागीय आयुक्ताना देण्यात आले आहेत. तरी याबाबतचे विभागीय आयुक्तांकडे पाठविले जाणारे वाहन खरेदीचे प्रस्ताव त्याचप्रमाणे मर्यादेपेक्षा खर्च झालेल्या कार्योत्तर मंजूरीचे प्रस्ताव वाहनाची सविस्तर माहीती, दुरुस्ती खर्च व त्याबाबतचा तपशिल व सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्राशिवाय पाठविले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविण्यापुर्वी या शासन निर्णयाचे जोडपत्र क मध्ये विहीत माहीती / प्रमाणपत्रासह पाठविण्यात यावी.

१३. उपरोक्त सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन वाहनाची दुरुस्ती / भाग खरेदीवरी तसेच पेट्राल / डिझेल वरील खर्च विहीत मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही याची सर्व संबंधितांनी कृपया दक्षता घ्यावी. तसेच आवश्यक तेव्हा वाहन त्वरित दुरुस्त करुन ते सुस्थितीत ठेवावे.

नि.वि.वि.क्र ग्प्र १०९५/प्र.क्र.२०/ ' विनियम, ९.६.१९९५.

१४. शासकिय वाहनाच्या देखाभालीवरील तो सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्याच्यिा दुरुस्तीसाठीच्या खर्चास मंजूरी देणे बाबत विहीत प्राधिका-याने वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र १०९५/प्र.क्र.२०/९५ विनीयम , दि. ९ जून, १९९५ नुसार शक्ती प्रदान करण्यात आले आहेत. या प्रदान केलेल्या शक्तींचा वापर वित्तीय अधिकार नियमावली १९७८ भाग -१ (विप्रक्र ४) यामध्ये नमूद केलेले विद्यमान अधिकार या शासन निर्णया सोबतच्या **जोडपत्र- ड** मध्ये माहीतीसाठी नमूद करण्यात आले आहेत.

प.क्र. पी १०९३/ आर ९१४/२६. २.८.१९९३.

नि.ग्रा.वि. जेईपी ८९/सीआर १०/२६.दि. ऑगस्ट.८९

इ) जिल्हा परिषद वाहनांच्या जिल्हा व राज्याबाहेरील वापरास पूर्व मंजूरी घेणेबाबत

जिल्हा परिषदेकडील स्वतःच्या निधीतून खरेदी केलेली अथवा शासनाने पुरविलेली वाहने जिल्हा परिषदेच्या कार्यालयीन कामकाजासाठी वापरावयाची आहेत. सदर वाहने उचित कारणासाठी वापरली जाणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेकडील वाहने संबंधित कार्यक्षेत्राबाहेर वापरणे अनुज्ञेय नाही. कार्यालयीन कामकाजासाठी काही अपरिहार्य कारणास्तव जिल्हा परिषदेची वाहने कार्यक्षेत्राबाहेर वापरणे आवश्यक असल्यास पुढीलप्रमाणे पूर्व मंजूरी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत :-

| | |
|---|---|
| अ) अध्यक्ष जिल्हा परिषद | १. महसूली विभागांतर्गत बैठका किंवा जिल्हा परिषदेच्या कामासाठी जाण्या करिता परवानगीची आवश्यकता नाही.<br>२. महसूली विभागाबाहेर शासनाने आमंत्रित केलेल्या बैठका संमेलनासाठी परवानगीची आवश्यकता नाही.<br>३. महाराष्ट्र राज्याबाहेरच्या प्रवासासाठी शासनाची पूर्व परवानगी घ्यावी. |
| ब) जिल्हा परिषदेचे इतर पदाधिकारी व पंचायत समितीचे सभापती | जिल्हा परिषद अध्यक्षाची पूर्व परवानगी घ्यावी. |
| क) जिल्हा परिषद अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घ्यावी. |

6

=२७=



ड) मुख्य कार्यकारी अधिकारी

शासन परिपत्रक क्रमाक झेडएनजी १०९८/प्रक्र. २१६/११, दिनाक ४ फेब्रुवारी, १९९९ अन्वये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत की, मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख आहेत आणि जिल्हा परिषदेमध्ये विकास कामांच्या दृष्टीने आणि इतर महत्वपूर्ण कामांसाठी त्यांनी मुख्यालयी असणे नितांत आवश्यक आहे. तथापि मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री , मा०उप मुख्यमंत्री, मा.मंत्री/राज्यमंत्री (ग्राम विकास) मुख्य सचिव, आणि सचिव ग्राम विकास यांनी आयोजित केलेल्या बैठका व्यतिरिक्त इतर कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्यासाठी मुख्यालय सोडण्यापूर्वी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय विभागाची पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे. तथापि, हे बंधन विभागीय आयुक्तांनी आयोजित केलेल्या बैठकांसाठी लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या प्रशिक्षणास जाण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिका-यानी ग्राम विकास विभागाची पूर्व समती घेणे आवश्यक राहील. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकरी यांनी भारतीय प्रशासन सेवेकरिता सक्तिचे करण्यात आलेले प्रशिक्षण हे अपवाद म्हणून गृहित धरण्यात आलेले आहे. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी. वरील सुचनांचा आधीन राहून वाहने कार्यक्षेत्राबाहेर वापरण्याकरिता खालील सूचना देण्यात येत आहे.

१) महसुली विभागांतर्गत बैठकीसाठी किंवा जिल्हा परिषदेच्या कामासाठी जाण्यासाठी परवानगीची आवश्यकता नाही.

२) महसूली विभागाबाहेर, विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी.

३) महाराष्ट्र राज्याबाहेर जाण्याकरिता राज्य शासनाची पूर्व परवानगी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रा. का. पवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.
उपमुख्य लेखा परिक्षक ( कनिष्ठ) स्थानिक निधी लेखा (सर्व)

## जोडपत्र अ

शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जेईपी १०९९/प्र.क्र १३५/०५ दिनांक ३१ ऑगस्ट १९९९ चे जोडपत्र - "अ"

---

जिल्हा परिषदेकडील निरुपयोगी व विनावापर पडून असलेल्या यंत्रसामुग्री/वाहनांच्या लिलावास मंजूरी देण्यासाठीच्या प्रस्तावासोबत पाठवावयाची माहिती -

१) सदर वाहन/यंत्रसामुग्री शासनाच्या कोणत्या विभागामार्फत जिल्हा परिषदेस मिळालेली आहे अथवा जिल्हा परिषदेने स्वतःच्या निधीतून खरेदी केलेली आहे.

२) सदर वाहन /यंत्रसामुग्रीची मूळ किंमत खरेदीची तारीख व कंपनी /मेक व वाहन क्रमांक

३) सदर वाहन यंत्रसामुग्री निकाली काढण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे किंवा कसे, समितीने ठरविलेली वाजवी किंमत (अपसेट व्हॅल्यू)

४) सदर यंत्रसामुग्री /वाहनाची सेवा - वर्षे व धावसंख्या वगैरे - किलोमीटर

५) जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या ठरावाची प्रत

६) सदर वाहन /यंत्रसामुग्री निकाली काढण्याची आवश्यकता असल्याबाबतचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व यांत्रिकी तज्ज्ञाचे प्रमाणपत्र पाठवावे. (प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे )

७) सदर वाहन / यंत्रसामुग्रीच्या लिलावानंतर लिलाव रक्कम जमा करावयाचे संबंधित विभागाचे संबंधित लेखाशीर्ष

## जोडपत्र ब

शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जेईपी १०९९/प्र.क्र.१३५/०५ दि. ३१ ऑगस्ट १९९९ चे जोडपत्र

---

### जिल्हा परिषदेसाठी वाहने भाडयाने घेण्यासठी प्रस्तावित अटी :-

१) वाहन दर महिन्याला ३००० कि. मी. चालेल

२) इंधन , वंगण , दुरस्ती व वाहन चालकाचा खर्च (वेतन; भत्ते प्रवास भत्ते इत्यादी ) वाहन मालकास द्यावा लागेल.

३) वाहनाचा वापर, ग्रामीण भाग, डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल

४) वाहन पूर्ण काळ म्हणजे २४ तास उपलब्ध असावे

५) वाहन सदैव सुस्थितीत असावे.

६) किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहन मालकाची जबाबदारी राहील.

७) किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती १ दिवसात तर मोठया स्वरुपाची दुरुस्ती जास्तीत जास्त ३ दिवसात करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

८) वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव जिल्हा परिषद कामकाजाच्या धावेत समाविष्ट असणार नाही.

९) पिरिऑडीकल मेंटेनन्ससाठी (peridical maintenance) लागणारे फिल्टर्स , वंगण व मजुरी वाहनाच्या दुरुस्ती व देखभाल यात समाविष्ट राहील.

१०) वाहन केवळ मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास व त्यामुळे जिल्हा परिषद कामावर अनिष्ट परिणाम झाल्यास निर्धारीत कंत्राट ठरल्यानंतर जे प्रती दिवस दर येईल त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे पैसे देयकातून कापून घेण्यात येतील.

११) वाहन मालकास मासीक अग्रीम देण्यात येईल एकूण अग्रीमाची रक्कम ही मुदत समाप्तीच्या शेवटच्या महिन्यात वळती करुन अंतिम अदागीच्या वेळी समायोजीत करण्यात येईल.

१२) सदर वाहन ह राज्यक्षेत्राकडीत निकषानुसार ॲम्बॅसिडर कार अथवा जीप असाव.

१३) वाहन संबंधित अधिकारी यांच्या अधिनस्त राहील, वाहनाचा वापर (कि.मी.)दुरुस्ती व अन्य सर्व बाबींची जबाबदारी त्यांची राहील.

## जोडपत्र क

शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्रमांक जेईपी १०९९/प्र.क्र १३५/०५, दि. ३१ ऑगस्ट १९९९ चे जोडपत्र

---

जिल्हा परिषदेकडील वाहनाच्या दुरुस्ती/सुटे भाग खरेदीसाठी विहित केलेल्या वार्षिक मर्यादेपेक्षा जास्त होणाऱ्या/झालेल्या खर्चास पूर्व मंजूरी /कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत प्रस्ताव पुढील सविस्तर माहितीसह विभागीय आयुक्तांकडे पाठवावेत.

१) गाडीचा क्रमांक , गाडीची मूळ किंमत, खरेदीची तारीख , गाडीची धावसंख्या किती किलो मिटर झाली आहे

२) सदर गाडी पेट्रोलवर /डिझेलवर चालणारी आहे.

३) सदर गाडी ग्राम विकास विभाग/मंत्रालयातील अन्य विभाग , जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या निधी यापैकी कोणाकडून कोणत्या योजनेंतर्गत खरेदी करण्यात आली आहे.

४) गाडीच्या दुरुस्तीसाठी हया वर्षाच्या जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे किंवा कसे.

५) सदर जादा खर्चास जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने मंजूरी दिलेली असावी व त्या ठरावाची प्रत पाठवावी.

६) सदर गाडी खरेदी केल्यापासून गाडीच्या दुरुस्ती/सुटे भाग खरेदीवरील आतापर्यंतचा वर्षनिहाय खर्च कळवावा.

७) सदर गाडीच्या दुरुस्तीवर व सुटे भाग खरेदीवर प्रत्यक्ष झालेला खर्च/ होणारा संभाव्य खर्च याबाबतचा तपशील संयुक्तीक कारणासह सोबत जोडलेल्या विवरणपत्रात द्यावा. (विवरणपत्र क्रमांक १ व २).*

८) सदर गाडीच्या दुरुस्ती/ सुटे भाग खरेदीवरील खर्च महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम १९६८ मधील कलम ९५(२)व (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे केलेला आहे किंवा कसे.

९) सदर गाडीच्या दुरुस्तीची व सुटे भाग खरेदीची आवश्यकता असल्याचे उप अभियंता/कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रमाणपत्र पाठवावे.

* (विवरण पत्र - १,२ व प्रमाणपत्र नमुना सोबत पहावा)

# विवरण पत्र - २

जिल्हा परिषद यांच्याकडील जीप/कार क्रमांक
वर सन मध्ये दुरुस्तीसाठी व सुटे भाग खरेदीसाठी झालेल्या एकूण खर्चाची तपशिलवार माहिती दर्शविणारे
विवरणपत्र.

| अ.क्र | बिल नंबर | तारीख | मेसर्सचे नाव | मालाचा तपशील | किंमत रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

एकूण रुपये

( )

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद.

## विवरण पत्र - २

जिल्हा परिषद ———————— . पंचायत समिती ———————— यांच्याकडील डिझेल/पेट्रोल जीप/कार क्रमांक ... वर सन —— मध्ये दुरुस्तीसाठी व सुटे भाग खरेदीसाठी होणाऱ्या संभाव्य खर्चाची तपशिलवार माहिती दर्शविणारे विवरणपत्र.

| अ.क्र. | संभाव्य दुरुस्तीचा तपशील | संभाव्य दुरुस्तीवरील खर्च रुपये | संभाव्य सुटे भाग खरेदीचा तपशील | संभाव्य सुटे भागांच्या खरेदीवरील खर्च रुपये | एकूण संभाव्य खर्च रुपये | कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

एकूण रुपये

( )

उप अभियंता / कार्यकारी अभियंता (यांत्रीकी)

जिल्हा परिषद.